# २. संख्याज्ञान

## तीन अंकी संख्या : उजळणी

◆ खालील उदाहरणे सोडवा.

१. [१], [२], [३], [४], [५], [६], [७], [८], [९], [0] यांपैकी अंककार्डे वापरून तीन अंकी दहा संख्या तयार करा व वाचा.(शतकस्थानी 0 घेता येणार नाही हे लक्षात घ्या.)

२. खालील संख्या अक्षरांत लिहा.

(१) ३२५  (२) ५४९  (३) ६६७  (४) ७८२  (५) ८९0  (६) ४0१

३. खालील संख्या अंकांत लिहा.

(१) एकशे दोन  (२) तीनशे वीस  (३) पाचशे सदुसष्ट
(४) चारशे पंचेचाळीस  (५) नऊशे नव्याण्णव  (६) सातशे छप्पन्न

४. क्रमाने पुढच्या संख्या लिहा.

(१) ३९९, ☐, ☐, ☐
(२) २00, ☐, ☐, ☐
(३) ५९७, ☐, ☐, ☐


५. क्रमाने मागच्या संख्या लिहा.


(१) ☐, ☐, ☐, ६00
(२) ☐, ☐, ☐, ३६९
(३) ☐, ☐, ☐, २९९


## चार अंकी संख्या


| प्रतीके | संख्या | संख्येचे वाचन |
|---|---|---|
|  | १000 | एक हजार |
|  | ४000 | चार हजार |
|  | २0१२ | दोन हजार बारा |
|  | २२0३ | दोन हजार दोनशे तीन |
|  | १0१0 | एक हजार दहा |
|  | १00१ | एक हजार एक |
|  | २३१४ | दोन हजार तीनशे चौदा |


◆ प्रतीके पाहा. संख्या लिहा व वाचा.


(१)



(२)



(३)



(४)



(५)



(६)



## अक्षरी संख्येचे अंकांत लेखन

(१) चार हजार अठ्ठावीस : ४०२८

हजाराच्या घरात ४ लिहिले. मग शतक, दशक व एककाच्या घरातही अंक लिहिले पाहिजेत. दिलेल्या संख्येत शतक नाहीत, म्हणून त्या घरात शून्य लिहिला. अठ्ठावीसमध्ये २ दशक व ८ एकक आहेत, म्हणून दशकाच्या घरात २ व एककाच्या घरात ८ लिहिले.

(२) पाच हजार तीनशे नऊ : ५३०९

या संख्येत हजाराच्या घरात ५, शतकाच्या घरात ३ आहेत. दशक नाहीत म्हणून दशकाच्या घरात ० लिहिले. एककाच्या घरात ९ लिहिले.

चार अंकी संख्या लिहिताना प्रथम हजाराच्या स्थानातील अंक लिहून नंतर क्रमाने शतक, दशक व एककाच्या स्थानात ० ते ९ पैकी योग्य अंक लिहावा.

## स्वाध्याय

१. दिलेल्या संख्या अंकांत लिहा.

| संख्या (अक्षरांत) | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| (१) चार हजार पाच | | | | |
| (२) पाच हजार सतरा | | | | |
| (३) सात हजार तीनशे तेरा | | | | |
| (४) आठ हजार | | | | |
| (५) नऊ हजार नऊशे नव्याण्णव | | | | |

२. संख्या वाचा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १००१ | २००२ | ४००४ | ५०५१ | ३०६७ | ७०३८ | ९००० |
| १०१० | २०२० | ४०४० | ५१०५ | ३६०७ | ७३०८ | ९००९ |
| ११०० | २२०० | ४४०० | ५१५० | ३६७० | ७०८३ | ९०९० |
| | | | ५५०१ | ३०७६ | ७८३० | ९९०० |

३. दिलेल्या संख्या वाचा. अक्षरांत लिहा.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२३५ | २३४१ | ३५०७ | ४११५ | ५०४५ | ६७८७ | ७८९० | ८८८८ | ९००७ |

४. प्रत्येक अंक एकदाच वापरून चार अंकी पाच संख्या लिहा आणि वाचा.

२, ३, ६, ७

५, ८, ०, ९

५. संख्यापाटीवर एककस्थानचा अंक, दशकस्थानचा अंक, शतकस्थानचा अंक व हजारस्थानचा अंक बदलून वेगवेगळ्या चार अंकी संख्या तयार करा व वाचा.

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| ३ | ० | २ | ५ |

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| १ | ४ | २ | ६ |

## पाच अंकी संख्या : ओळख

रेश्मा : सर्वांत मोठी चार अंकी संख्या कोणती आहे ?

सचिन : नऊ हजार नऊशे नव्याण्णव !

नर्गिस : त्याच्या पुढची संख्या कोणती ?

ताई : करूनच पाहू. संख्येत १ मिळवला, की पुढची लगतची संख्या मिळते, हे माहीत आहे ना ? आता ९९९९ + १ ही बेरीज उभ्या मांडणीत करू.

९ एकक + १ एकक हे १० एकक होतात.

त्यांचा १ दशक (हातचा) तयार होतो.

तो दशकाच्या घरात मांडू. ९ द + १ द मिळून १० दशक.

त्यांचा १ शतक (हातचा) होतो.

तो शतकाच्या घरात मांडू.

९ श + १ श मिळून १० शतक.

१० शतकांचा १ हजार. तो १ हजार, हजाराच्या घरात मांडू.

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| | १ | १ | १ | |
| | ९ | ९ | ९ | ९ |
| + | | | | १ |
| १ | ० | ० | ० | ० |

हजाराच्या घरात ९ + १ म्हणजे १० आले, म्हणून ती संख्या दहा हजार आहे. हे दहा हजार एकत्र करून त्याला ‘एक दशहजार’ म्हणू. त्याच्यासाठी हजाराच्या डावीकडे एक नवे स्थान निर्माण करू. त्याला ‘दह’ हे नाव देऊ.

## पाच अंकी संख्यांचे वाचन व लेखन

◆ खालील पाच अंकी संख्या पाहा.

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ५ | ७ | ८ |

या संख्येचे वाचन एक दशहजार, तीन हजार, पाचशे अठ्ठ्याहत्तर असेही करता येईल; परंतु सोईसाठी ही संख्या 'तेरा हजार पाचशे अठ्ठ्याहत्तर' अशी वाचतात; म्हणजेच वाचताना दह आणि ह ही स्थाने एकत्र घेतात.


◆ पुढील संख्या वाचा व अक्षरांत लिहा.

२०,००० = वीस हजार     ६८,००० = .............     ७९,००० = .............

८०,००० = .............     ५४,००० = .............     ९९,००० = .............


◆ प्रतीके पाहा. तयार झालेल्या संख्या वाचा.

(१)





४२,१२१ = बेचाळीस हजार एकशे एकवीस

(२)





५०,००१ = पन्नास हजार एक

(३)




६०,०२६ = .............

(४)




३१,००० = .............

## अक्षरी संख्येचे अंकांत लेखन

(१) बासष्ट हजार सदतीस : ६२,०३७

६२ ह = ६० ह + २ ह म्हणजेच यात ६ दह व २ ह आहेत. या संख्येत शतक नाहीत, म्हणून शतकाच्या घरात शून्य लिहिले.

(२) सत्तर हजार दोनशे सहा : ७०,२०६

७० हजार म्हणजे ७ दह आहेत. याशिवाय संख्येत आणखी हजार नाहीत व दशकही नाहीत, म्हणून हजार व दशक या घरांत ० लिहिले.

(३) तीस हजार एक : ३०,००१

इथे ३० हजार म्हणजे ३ दह आहेत. याशिवाय संख्येत आणखी हजार, शतक किंवा दशकही नाहीत, म्हणून त्या घरांत ० लिहिले.

## स्वाध्याय

१. अक्षरी संख्या अंकांत लिहा.

(१) चाळीस हजार (२) पन्नास हजार पन्नास (३) बारा हजार तीनशे तेरा

(४) पंचेचाळीस हजार तीन (५) तेवीस हजार एकशे पाच (६) अडुसष्ट हजार पाच

२. संख्या वाचा व अक्षरांत लिहा.

(१) ५२,०४५ (२) २३,४०९ (३) ४५,६००

(४) ४१,००० (५) ९९,९९९ (६) ९५,७६८

३. सोबतच्या संख्यापाटीवर एकक, दशक, शतक, हजार, दशहजारस्थानचे अंक बदलून पाच संख्या लिहा व वाचा.

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | १ | १ |

४. ९, ५, ६, १, ८ यांपैकी प्रत्येक अंक एकदाच वापरून पाच अंकी सहा संख्या लिहा.

५. १, ५, ६, ४, ७ हे अंक वापरून सर्वांत मोठी संख्या लिहा.

६. ४, ३, ९, ८, ७ हे अंक चढत्या क्रमाने आणि उतरत्या क्रमाने लिहून दोन संख्या लिहा.

७. ६, ०, ७, ५, ४ यांतील ७ हा अंक एककस्थानी घेऊन पाच संख्या तयार करा व लिहा.

८. ४, ९, ३, ५, १ यांपैकी सर्वांत लहान अंक एककस्थानी घेऊन पाच संख्या लिहा.

## संख्येचे विस्तारित रूप

हमीद : ५,३२४ ही संख्या बेरजेच्या रूपात किंवा विस्तारित रूपात मांडता येईल का ?

ताई : आपण तीन अंकी संख्येचे विस्तारित रूप लिहायला शिकलो आहोत. त्याप्रमाणेच चार किंवा पाच अंकी संख्येचे विस्तारित रूप लिहूया.

शरद : ५,३२४ म्हणजे ५ हजार, ३ शतक, २ दशक व ४ एकक.

मेरी : म्हणजे ५,३२४ चे विस्तारित रूप ५००० + ३०० + २० + ४ आहे.

ताई : याप्रमाणे २३,३७५ या पाच अंकी संख्येचे विस्तारित रूप लिहा.

शरद : २३,३७५ म्हणजे २ दह, ३ ह, ३ श, ७ द व ५ ए.

२३,३७५ चे विस्तारित रूप २०,००० + ३,००० + ३०० + ७० + ५

## स्वाध्याय

१. खालील संख्या विस्तारित रूपात लिहा.

(१) ७,५४५ (२) ४,०५० (३) ६५,१०० (४) ८,००० (५) १२,७४५

(६) ७८,९९९ (७) ९,३९२ (८) ५०,१०५ (९) ७०,४९५ (१०) ८२,७२७

२. विस्तारित रूपावरून संख्या लिहा.

(१) ३,००० + २०० + ५० +७ = **३२५७**  (२) १०,००० + ५,००० + १ = ☐

(३) ४००० + ५०० + १० + ३ = ☐  (४) २०,००० + ३०० + ४० + ५ = ☐

(५) ७,००० + ८० + ३ = ☐  (६) ९०,००० + ९० + २ = ☐

३. अंक व त्यांची स्थाने दिलेली आहेत. त्यावरून संख्या तयार करा व लिहा.

जसे, ५ दह, २ ह, ३ श, २ द, १ ए = ५२,३२१ ; ९ श, ८ दह, ५ ए = ८०९०५

(१) ७ ए, २ द, ५ दह, ९ ह  (२) ३ श, ४ ह, ५ द, १ दह

(३) ५ द, ८ ह, ७ दह  (४) ५ ह, ७ दह, ३ श, २ द, ४ ए

## स्थानिक किंमत

ताई : आज आपण खेळ खेळूया. मी एक संख्या सांगेन. त्या संख्येचे विस्तारित रूप तुम्ही सांगायचे. संख्या : ५५,५५५

ध्रुव : ५०,००० + ५,००० + ५०० + ५० + ५

प्रियांका : संख्येत सर्व स्थानांत ५ हाच अंक आहे, पण प्रत्येकाची किंमत मात्र वेगवेगळी आहे !

ताई : अंकाची जागा किंवा स्थान त्या अंकाची स्थानिक किंमत ठरवते.
३७८४२ या संख्येतील प्रत्येक अंकाची स्थानिक किंमत सांगा.

ध्रुव : मी सांगतो. ३ दह म्हणजे ३ दशहजार म्हणजे ३०,०००, ७ ह म्हणजे ७०००, ८ श म्हणजे ८००, ४ द म्हणजे ४०, २ ए म्हणजे २.


## स्वाध्याय

खालील संख्यांमधील अधोरेखित अंकांची स्थानिक किंमत लिहा.

(१) १,९$\underline{९}$९  (२) $\underline{२}$,३४५  (३) २,००$\underline{०}$  (४) ४,$\underline{८}$३५

(५) ३,७४$\underline{९}$  (६) २$\underline{७}$,८५९  (७) ६७,$\underline{७}$७७  (८) $\underline{५}$६,७०८  (९) ३$\underline{०}$,०५०

## घडीपट्टीच्या साहाय्याने संख्येचे विस्तारित रूप




✍ **लक्षात घ्या :** तीन, चार किंवा पाच अंकी संख्येचे वाचन करताना प्रथम सर्वांत जास्त स्थानिक किंमत असलेल्या अंकाचे वाचन व नंतर क्रमाने कमी स्थानिक किंमत असलेल्या अंकांचे वाचन करतात.

## संख्याचिन्हाचे वेगवेगळे अर्थ

| | | |
|---|---|---|
| ताई | : | ‘एकशे पंचवीस’ ही संख्या आपण अंकांत ‘१२५’ अशी लिहितो, म्हणजे ‘१२५’ हे ‘एकशे पंचवीस’ या संख्येसाठी वापरलेले एक चिन्ह आहे; पण या चिन्हाचे वेगवेगळे अर्थ होतात. |
| गौरी | : | एकाच चिन्हाचे वेगळे अर्थ ? कसं काय ? |
| ताई | : | गौरी, समज तुला तुझ्या मैत्रिणीला १२५ रुपये द्यायचे आहेत आणि तुझ्याकडे फक्त १ रुपयाची खूप नाणी आहेत, तर तू ते कसे देशील ? |
| गौरी | : | मी १ रुपयाची १२५ नाणी देईन. |
| ताई | : | म्हणजे १२५ या संख्याचिन्हाचा अर्थ ‘१२५ एकक’ असा होईल.<br>सुधीर, समज तुझ्याकडे फक्त १० रुपयांच्या काही नोटा आणि १ रुपयाची काही नाणी आहेत. तुला १२५ रुपये द्यायचे आहेत, तर तू ते कसे देशील ? |
| सुधीर | : | मी १० रुपयांच्या १२ नोटा आणि १ रुपयाची ५ नाणी देईन, म्हणजे मी दिलेल्या नाणी नोटांप्रमाणे, १२५ चा अर्थ १२ दशक ५ एकक असा होईल. |
| ताई | : | बरोबर. अजित समज तुझ्याकडे १०० रुपयांच्या काही नोटा, १० रुपयांच्या काही नोटा आणि १ रुपयाची काही नाणी आहेत. तुला १२५ रुपये द्यायचे, तर ते तू कसे देशील? |
| अजित | : | मी १०० रुपयांची एक नोट, १० रुपयांच्या दोन नोटा आणि १ रुपयाची ५ नाणी देईन. त्याप्रमाणे १२५ चा अर्थ १ शतक, २ दशक व ५ एकक असा होईल. |
| ताई | : | म्हणजे १२५ या संख्याचिन्हाचे तीन वेगवेगळे अर्थ आहेत, हे लक्षात घ्या.<br>१२५ = एकशे पंचवीस एकक<br>१२५ = बारा दशक पाच एकक<br>१२५ = एक शतक, दोन दशक व पाच एकक<br>आता ४०८३ या संख्याचिन्हाचे वेगवेगळे अर्थ तुम्हांला सांगता येतील का ? |
| सुधीर | : | एक अर्थ ‘चार हजार त्र्याऐंशी एकक’ असा होईल. |
| अजित | : | आणखी एक अर्थ ‘चारशे आठ दशक, तीन एकक’ असा होईल. |
| मलिका | : | आणखी एक अर्थ ‘चाळीस शतक, आठ दशक, तीन एकक’ असा होईल. |
| गौरी | : | अजून एक अर्थ ‘चार हजार, शून्य शतक, आठ दशक, तीन एकक’ असा होईल. |
| ताई | : | असे आणखीही वेगवेगळे अर्थ आपण सांगू शकतो. |

### स्वाध्याय

खाली दिलेल्या संख्याचिन्हांचे वेगवेगळे अर्थ समजावून घ्या व लिहा.

(१) ६७९ (२) ८६३ (३) ६७४५ (४) ९८५६ (५) १०२७

## लगतची मागची व लगतची पुढची संख्या सांगणे

मेरी : नंदू १२० च्या लगतची पुढची संख्या सांगतोस का?
नंदू : १२१
मेरी : १९९९ च्या लगतची पुढची संख्या सांगतोस का?
नंदू : मला नाही सांगता येत.
ताई : लगतची पुढची संख्या १ नं मोठी असते, तर लगतची मागची संख्या १ नं लहान असते.
नंदू : म्हणजे, १९९९ मध्ये १ मिळवल्यास लगतची पुढची संख्या १९९९ + १ = २००० ही मिळेल.
ताई : तसंच दिलेल्या संख्येतून १ वजा केल्यास लगतची मागची संख्या मिळते.
नंदू : म्हणजे १९९९ च्या लगतची मागची संख्या १९९८ आहे.

**स्वाध्याय**

लगतची मागची संख्या व लगतची पुढची संख्या लिहा.

| संख्या | लगतची मागची संख्या | लगतची पुढची संख्या | संख्या | लगतची मागची संख्या | लगतची पुढची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २९९९ | | | १००० | | |
| ३८०० | | | ३४५९ | | |
| ७७९८ | | | ५००९ | | |

## संख्यांचा लहान–मोठेपणा

ताई : संख्यांच्या लहान–मोठेपणाविषयी तुम्ही काय शिकला आहात ?
नंदू : कोणतीही तीन अंकी संख्या, कोणत्याही दोन अंकी संख्येपेक्षा मोठी असते.
प्रिया : दोन्ही संख्या तीन अंकी असतील, तर जिचा शतकस्थानचा अंक मोठा, ती संख्या मोठी.
ताई : मग आता चार अंकांपर्यंतच्या संख्यांचा लहान–मोठेपणा कसा ठरवाल ?
प्रिया : कोणतीही तीन अंकी संख्या, कोणत्याही चार अंकी संख्येपेक्षा लहानच असणार !
नंदू : दोन्ही संख्या चार अंकी असतील, तर जिचा हजारस्थानातील अंक मोठा, ती संख्या मोठी. हजारस्थानचे अंक सारखे असतील, तर शतकस्थानचे अंक पाहून ठरवू. तेही समान असतील, तर दशकस्थानावरून लहान–मोठेपणा ठरवू. जसं, ४५६७ > ४३२५.

**स्वाध्याय**

खालील सारणी पूर्ण करा.

| संख्या | लहान संख्या | मोठी संख्या | संख्या | लहान संख्या | मोठी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २१२३, १९६८ | | | ९९९९, ९९९ | | |
| २३४२, २४३२ | | | ६०७०, ८०७९ | | |
| ९५४२, ९५४९ | | | ५९७८, ७५३९ | | |

## चढता-उतरता क्रम

दुकानात वेगवेगळ्या कंपन्यांची कपाटे विक्रीस आहेत. एका कपाटाची किंमत ४,७५० रुपये, दुसऱ्या कपाटाची किंमत ६,२०० रुपये व तिसऱ्या कपाटाची किंमत ३,९८० रुपये आहे.

कपाटाची सर्वांत जास्त किंमत : ₹ ६२००

कपाटाची सर्वांत कमी किंमत : ₹ ३९८०

कपाटाच्या किमती चढत्या क्रमाने : ३९८० < ४७५० < ६२००

कपाटाच्या किमती उतरत्या क्रमाने : ६२०० > ४७५० > ३९८०

२९८०, ३०००, ५१२५ या संख्यांचा चढता व उतरता क्रम लावा.

चढता क्रम : २९८० < ३००० < ५१२५ उतरता क्रम : ५१२५ > ३००० > २९८०

## स्वाध्याय

खालील संख्यांचा चढता व उतरता क्रम लावा.

(१) २३४५, २३४९, २३४७ (२) ६०००, ५०७०, ३००७ (३) ५००७, २००७, ३००७


(४) १००९, १९००, १०९० (५) ४१८०, ६१८०, ७१८० (६) २९१७, ३४५६, १३५७

## सम संख्या व विषम संख्या

ताई : फुलांचे दोन-दोनचे गट करून पाहूया.
मायकेल तुला ४ फुलं घे, परमजित तुला ५, रेश्मा तुला ६, माधुरी तुला ८ आणि मनीषा तुला ९ फुलं घे. गट केल्यावर फुलं किती उरली, ते पण सांगायचं.

मायकेल : माझ्या चार फुलांचे दोन गट झाले, एकही फूल उरलं नाही.

परमजित : माझ्या पाच फुलांचे दोन गट झाले, पण एक फूल उरलं.




ताई : ज्यांच्या फुलांचे दोन-दोनचे गट झाले आणि एकही फूल उरलं नाही, त्यांच्या फुलांच्या संख्या एका गटात मांडू. गट करताना १ फूल उरलं अशा संख्या वेगळ्या गटात मांडू.

एकही फूल न उरलेल्या फुलांच्या संख्यांचा गट ४, ६, ८

एक फूल उरलेल्या फुलांच्या संख्यांचा गट ५, ९

ताई : दोन्ही गटांतील संख्या नीट पाहा. त्यात कोणता फरक लक्षात येतो ?

रेश्मा : ४, ६, ८ या संख्यांना २ नं भागलं, तर बाकी उरत नाही आणि ५ व ९ ला २ नं भागलं तर बाकी १ उरते.

ताई : ज्या संख्यांना २ नं भागल्यावर बाकी उरत नाही, त्यांना सम संख्या म्हणतात.
४, ६, ८ या सम संख्या आहेत.
ज्या संख्यांना २ नं भागल्यावर बाकी १ उरते, त्यांना विषम संख्या म्हणतात.
५ व ९ या विषम संख्या आहेत.

◆ खालील संख्यांएवढ्या वस्तू (खडे, मणी इ.) घेऊन दोन-दोनचे गट करून सम संख्या व विषम संख्या ठरवा.

१२, ११, १०, २३, २७, ३४, २५, ३६, ३९, ४१, ४५, ५२, १६, १७, १९, २८

- सम संख्यांच्या गटात लिहिलेल्या संख्यांचे एककस्थानचे अंक लिहा.
- विषम संख्यांच्या गटात लिहिलेल्या संख्यांचे एककस्थानचे अंक लिहा.

◆ समसंख्येच्या/विषमसंख्येच्या एककस्थानी नेहमी कोणते अंक येतात ते पाहा.

समसंख्येच्या एककस्थानचे अंक : ०, २, ४, ६, ८

विषमसंख्येच्या एककस्थानचे अंक : १, ३, ५, ७, ९

◆ एककस्थानचे अंक पाहून दिलेली संख्या सम आहे की विषम ते ठरवा.

३५, ६७, ३२, ३०, ४३, ३४, ५१, ५६, ८८, ७९

## आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हे

सुरेश : ए विजया, सकाळी एक गोष्ट माझ्या लक्षात आली. आपल्याकडच्या सगळ्या नोटांवर छापलेल्या संख्या इंग्रजीत असतात.

विजया : खरंच की ! पण असं का रे ? आपण तर संख्या वेगळ्या प्रकारानं लिहितो.

सुरेश : मलाही तोच प्रश्न पडलाय. चल, आपण ताईंना विचारू.
ताई, सगळ्या नोटांवरच्या संख्या इंग्रजीतच का असतात ?

विजया : आणि बहुतेक सगळ्या वाहनांवरचे नंबरही.

ताई : छान ! आधी तुमच्या निरीक्षणाबद्दल तुम्हांला शाबासकी देते. मला आधी सांगा, तुमच्यापैकी कोणी आपला महाराष्ट्र सोडून दुसरीकडे गेला होतात का ?

विजया : हो ताई. आम्ही कर्नाटकात गेलो होतो.

ताई : तिथल्या दुकानांच्या पाट्या तुला वाचता आल्या का ?

विजया : नाही.

ताई : त्या आपल्याला वाचता येत नाहीत, कारण त्यांची अक्षरं लिहिण्याची पद्धत वेगळी असते. तसंच त्यांची अंक लिहिण्याची पद्धतही वेगळी असते.

सुरेश : हो ताई, ते कसं लिहितात ?

ताई : आपण १, २, ३, ... , १० असं लिहितो, ते कानडीत कसं लिहितात ते पाहा.

೧ ೨ ೩ ೪ ೫ ೬ ೭ ೮ ೯ ೧೦

मग नोटांवर १, २, ३ असे अंक लिहिले तर ते त्यांना कसे समजतील ?

विजया : आणि त्यांच्यासारखे लिहिले तर आपल्याला नाही कळणार !

ताई : बरोबर. म्हणजे नोटांवरील संख्या अशा लिहिल्या पाहिजेत, की त्या भारतातील सगळ्या लोकांना समजतील. एवढंच नाही, तर परदेशातून आपल्या देशात येणाऱ्यांनाही समजतील.

सुरेश : मग आपण दुसऱ्या देशात गेलो, तर आपल्यालाही तिथल्या नोटांवरच्या संख्या कळायला हव्या.

ताई : अगदी बरोबर ! म्हणूनच जगातल्या सगळ्या देशांनी असं ठरवलं आहे, की नोटांच्या किमती, त्यांचे क्रमांक; आगगाडीच्या, बसच्या व विमानाच्या तिकिटांचे क्रमांक असं सगळं इंग्रजी अंकांत छापायचं.

विजया : म्हणूनच आपल्याकडे बस, रिक्षा यांचे क्रमांक इंग्रजीत लिहीत असले पाहिजेत. आता आलं लक्षात !

ताई : हो ना ! संख्या इंग्रजी अंक वापरून लिहिल्या, की जगातल्या सगळ्या लोकांना समजतात, म्हणून इंग्रजी अंकांनाच आता 'आंतरराष्ट्रीय अंक' म्हणतात. हे अंक तुम्हांला माहीत आहेत. पुढील इयत्तांमध्ये तुम्हांला हेच अंक वापरायचे आहेत.

| देवनागरी संख्याचिन्ह | ० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंतरराष्ट्रीय संख्याचिन्ह | 0 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |

| देवनागरी संख्याचिन्हांत | ४९७ | २३५ | ४३७ | ५६८ | ६७२ | ७९९ | ८०० | ९१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हांत | 497 | 235 | 437 | 568 | 672 | 799 | 800 | 912 |

## संख्यांचे वाचन व अक्षरांत लेखन

4536 याचे वाचन 'चार हजार पाचशे छत्तीस' असे करतात.

27,105 याचे वाचन 'सत्तावीस हजार एकशे पाच' असे करतात.

64,089 याचे वाचन 'चौसष्ट हजार एकोणनव्वद'असे करतात.

## स्वाध्याय

१. खालील संख्या वाचा व अक्षरांत लिहा.

(१) 20,504 (२) 97,487 (३) 30,008 (४) 4,879 (५) 6,405 (६) 893

२. आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हे तुम्ही कोठे कोठे बघितली आहेत, ते लिहा.

३. वस्तूंच्या आंतरराष्ट्रीय अंकांत लिहिलेल्या किमती पाहा व वाचा.